जाहिरात नमुना - सन २०२३-२४ (४ थी जाहिरात)

राष्ट्रीय आरोग्य अभियान

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर येथून सोलापुर जिल्हयांतर्गत ७७ प्राथमिक आरोग्यवर्धिनी केंद्र आणि ३२९ आरोग्यवर्धिनी उपकेंद्रस्तरावर साप्ताहिक योगसत्र राबविण्याकामी, मानधन तत्वावर एकुण ४०६ ठिकाणी योग प्रशिक्षक यांची तालुकास्तरीय योग प्रशिक्षक पॅनल निवड प्रक्रिया राबविण्यात येत असुन, सदरील पदे ही रोजंदारी तत्वावरील मोबदला स्वरुपात असुन, खालील तक्तानुसार पात्र ठरत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदांचे नाव	रिक्त पद संख्या	पदांची शैक्षणिक अर्हता	प्रति सत्र मोबदला	वयो मर्यादा	तालुक्यांचे नाव - आरोग्यवर्धिनी केंद्र (HWC) व संख्या
योग प्रशिक्षक	406 (77 PHC + 329 HWC)	**खालीलपैकी कोणतेही एक असणे अनिवार्य** 1) Ph.D in Yoga. 2) M.Phill in Yoga. 3) Post Graduate Degree in Yoga. 4) Degree (UGC Approved) BYNS (Bachelor of Naturopathy and Yogic Science) 5) Post Graduate Diploma in Yoga. 6) Diploma in Yoga 7) YCB / QCI - Level-3/ Level-2/ Level-1 8) Renowned Institute Certificate in Yoga वरील क्रमाने प्राधान्यक्रम दिला जाईल	रु. ५००/- प्रति योग सत्र	कमीत कमी १८ वर्षे ते जास्तीत जास्त ६५ वर्षापर्यन्त	१) दक्षिण सोलापुर - ३२ (HWC - 6 PHC + 26 SC) २) उत्तर सोलापुर - १७ (HWC - 4 PHC + 13 SC) ३) अक्कलकोट - ४३ (HWC - 8 PHC + 35 SC) ४) बार्शी - ४५ (HWC - 7 PHC + 38 SC) ५) करमाळा - ३५ (HWC - 5 PHC + 30 SC) ६) माळशिरस - ५३ (HWC - 12 PHC + 41 SC) ७) सांगोला - २७ (HWC - 6 PHC + 21 SC) ८) मंगळवेढा - २७ (HWC - 5 PHC + 22 SC) ९) मोहोळ - ३७ (HWC - 8 PHC + 29 SC) १०) माढा - ४७ (HWC - 8 PHC + 39 SC) ११) पंढरपुर - ४३ (HWC - 8 PHC + 35 SC)

अटी व शर्ती :-

१) वरील सर्व पदे ही रोजंदारी दैनंदिन व प्रति सत्र मोबदला या स्वरुपाची असुन, पॅनल स्वरुपात निवड करणेत येत आहे. त्यांचा कालावधी हा दि.३१/०३/२०२४ पर्यन्तचा राहील. तसेच सदर पद सन २०२३-२४ मध्ये काही कारणास्तव नामंजूर / रद्द झाल्यास किंवा सन २०२४-२५ करीता सदरील पदांना मंजूरी अप्राप्त राहिल्यास वरील सर्व पदांची सेवा दिनांक ३१/०३/२०२४ रोजी आपोआप संपुष्टात येईल. परंतू वरील पदे सन २०२४-२५ करीता मंजूर झाल्यास पुढील ११ महिणे व २९ दिवस या कालावधीकरीता पुनर्नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल. सदर पॅनल २ वर्षाकरीता ग्राहय राहिल.

२) उमेदवारांकडून **दिनांक २२/०१/२०२४ ते दिनांक ३१/०१/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत, सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११.०० ते दुपारी ०५.०० या वेळेतच अर्ज स्विकृती करण्यात येईल. अर्ज स्विकृती ही जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर** या ठिकाणी करण्यात येईल. तालुकानिहाय योग प्रशिक्षक पॅनल तयार करावयाचे असल्याने, एका उमेदवारांने फकत एकच अर्ज करुन, एकच तालुकाकरीता अर्ज सादर करावा.

३) योग प्रशिक्षक हे पद रोजंदारी व दैनंदिन स्वरुपाची व प्रति सत्र मोबदला वरील असल्याने, सदर पदाकरीता शासकिय सेवेनुसार असलेले नियम, अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. त्याचसोबत यावरील सर्व पदाकरीता शासनाकडील सेवा नियम लागू होत नाहीत.

४) सर्व पदांकरीता उमेदवारांनी अर्ज सादर करताना प्रथम विहीत नमुण्यातील अर्ज, डिमांड ड्राफटची झेरॉक्स, १० वी गुणपत्रक आणि सनद (जन्म तारीख पुरावा म्हणुन, १२ वी गुणपत्रक आणि सनद, पदवीचे गुणपत्रक (१ ले वर्ष ते अंतिम वर्ष-सर्व Attempt सह - जेणेकरुन एकत्रित गुण काढणे शक्य होईल), पदवी प्रमाणपत्र (Convocation Certificate), ज्या-त्या शैक्षणिक अर्हतेस संबधित परिषदेकडील नोंदणी लागू आहे त्या-त्या शैक्षणिक अर्हतेची वैद्य असलेली परिषदेकडील नोंदणी प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणुन (शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) व इतर आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसाक्षांकित) करुन जोडावीत.

५) प्रमाणपत्रामध्ये Grading System नुसार मार्क असतील त्यांनी संबधित प्रमाणपत्रामागील % Calculation Grade Card झेरॉक्स अर्जासोबत जोडण्यात यावी. % Calculation Formula नसेल तर संबधित कॉलेज/संस्थेकडून त्यांचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन अर्जासोबत जोडावे. (विशेषत: CGPA/ SGPA), अर्जासह जोडलेल्या सर्व कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक टाकण्यात यावेत. अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरीता अर्जाच्या वरील पृष्ठभागाची झेरॉक्स घेऊन येणे.

६) जाहिरातीतील पदाकरीता नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेसोबत, संबधित परिषदेकडील नोंदणी करणे लागू होत असल्यास, उमेदवारांने वैध असलेली नोंदणीचे प्रमाणपत्र/Renewal Slip/Smart Card व इतर बाबी अर्जासोबत सादर कराव्यात. त्याचसोबत अतिरीक्त शिक्षणाची नोंद ही परिषदेकडे केलेली असावी. परिषदेकडील Smart Card असलयास त्याची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. तसेच सदरील प्रमाणपत्रावरील नोंदणीची वैधता ही ग्राहय धरणे सोयीस्कर होईल.

७) उपरोक्त पदभरतीबाबत असलेल्या सर्व सुचना (तात्पुरते पात्र/अपात्र, हरकती स्विकारणे, अंतिम पात्र/अपात्र, संभाव्य निवड झालेल्यांची यादी, निवड समितीमार्फत मुलाखत व प्रात्याक्षिक प्रक्रियाबाबतचे वेळापत्रक व इतर बाबी) हया जिल्हा परिषद, सोलापुर चे अधिकृत संकेतस्थळ www.zpsolapur.gov.in वर व सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकृत संकेतस्थळ www.arogya.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत उमेदवारांस कोणतेही सुचना, दूरध्वनी निरोप, SMS, Email केला जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. उमेदवारांनी वेळोवळी संकेतस्थळास भेट देणे अनिवार्य राहिल.

८) सदर रिक्त पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नियुक्ती ठिकाणामध्ये बदल, नमुद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन पदभरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

९) ठराविक प्रमाणपत्र सादरीकरण करणेकामी सेतु कार्यालयाकडील पावती अर्जासोबत सादर केलेली असल्यास, सदरील उमेदवारांचे अर्ज तात्पुरत्या पात्र/अपात्र यादीमध्ये अपात्र ठरविण्यात येतील. पंरतू, उमेदवारांनी हरकती वेळेस सदरील सेतु कार्यालयाकडील प्रमाणपत्र सादर केल्यास संबधित उमेदवारांचे अर्ज अंतिम पात्र/अपात्र यादी मध्ये पात्र ठरविण्यात येतील यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

१०) परावैदयकिय परिषदेकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणतेही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापि वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. तसेच परिषदेकडील नोंदणी करणेकामी फी भरलेली पावती, नोंदणी करीता सादर केलेला अर्जाची प्रत अर्जासोबत जोडल्यास ती ग्राहय धरली जाणार नाही. संबधित उमेदवाराकडे नोंदणीचे प्रमाणपत्र व वैध असलेले प्रमाणपत्र असणे अपेक्षित आहे.

११) **अर्जाचा नमुना हा जिल्हा परिषद, सोलापुर च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असुन, सदरील अर्जाचा नमुना प्रिंट मध्ये अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज स्विकारला जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. (स्वत: टंकलिखीत केलेले, नमुनामध्ये बदल असल्यास, अथवा इतर अर्ज विक्री केंद्राच्या नावानुसार असलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.)**

१२) उमेदवारांकडून अर्धवट, अपूर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केले गेला असल्याने, संबधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास, अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वीपणे संपूर्ण जबाबदारी संबधित उमेदवारांची राहिल याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्विकारली जाणार नाही. अर्ज भरणेकामी काही अडचणी असल्यास कार्यालयास समक्ष भेट देऊन विचारणा करण्यात यावी.

१३) उमेदवार हा संबधित पदासाठी शाररीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. तसेच उमेदवारांविरुध्द कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा झालेला नसावा. तसेच तो शासकिय, निमशासकिय अथवा NHM मधील कार्यरत कर्मचारी नसावा.

१४) केंद्र सरकार अथवा राज्य शासनाकडून संबधित पद नामंजूर केल्यास उमदेवारांस कोणतीही पुर्वसुचना न देता संबधित उमेदवारांची सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

१५) योग प्रशिक्षक जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत पात्र उमेदवारांची त्यांच्या वरील तक्तातील शैक्षणिक अर्हतेप्रमाणे योग प्रात्याक्षिक व मुलाखत प्रक्रियेव्दारे संबधित तालुक्यासाठी पॅनल तयार करण्यात येईल. तसेच त्यांना तालुका आरोग्य अधिकारी यांचे स्तरावरुन १ किंवा अधिक आरोग्यवर्धिनी केंद्र ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. नियमानुसार एका दिवशी जास्तीत जास्त २ ठिकाणी योग सत्र घेता येतील.

१६) वैयक्तिक किंवा २ पेक्षा जास्त सत्रास अनुपस्थिती राहिल्यास, कार्यालयाकडून एकतर्फी निर्णय घेऊन, दिलेली नियुक्ती रद्द करुन, पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१७) वयाचा पुरावा म्हणुन उमेदवारांने शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (सनद) सादर करावी अथवा ज्यावरुन उमेदवारांची जन्मतारीख ग्राहय धरणे साईस्कर होईल अशा पध्दतीचे प्रमाणपत्र सादर करावे.

१८) **उमेदवारांनी मुद्दा क्रमांक ०२ मधील नमुद केलेल्या कालावधीमध्ये, कार्यालयीन दिवशी, दिलेल्या वेळेत व्यक्तीश: उपस्थित राहुन अर्ज सादर करण्यात यावेत. नमुद मुदती अगोदर अथवा मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार अथवा कोणताही दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये.**

१९) अर्जासोबत **कागदपत्रे जास्त प्रमाणात होत असल्यास, स्टेपलरपिन चा वापर करण्याऐवजी** उमेदवारांनी अर्जाची कागदपत्रे एकत्रितपणे जोडणेकामी **टॅग अथवा लेसचा** वापर करावा.

२०) पदभरतीतील पदे ही राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दि.२७/०४/२०२३ रोजीच्या पत्रातील दिलेल्या सुचनेनुसार गुणांकन पध्दतीने भरली जातील. गुणांकन पध्दत ही पुढील प्रमाणे राहिल.

अ.क्र.	विवरण	तपशिल	अधिकतम गुण
१	पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (पदवी अथवा पदविका) (अंतिम वर्षाच्या गुणाच्या अधारे)	मिळालेल्या एकुण गुणाच्या टक्केवारीचे ५०% प्रमाणे Proportion राहिल. (उदा:- ६० % गुण प्राप्त असल्यास, त्यांचे ५० % प्रमाणे) {Proportion= ६० X ५०/१०० = ३० गुण}	जास्तीत जास्त ५० गुण ग्राहय धरले जातील
२	पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेण्यात येईल)	अधिकतम २० गुण ग्राहय धरले जातील. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २०% प्रमाणे Proportion काढावे. (उदा :- एका पदांची BA ही आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करुन अतिरिक्त MA ही शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवारांस MA करीता ६०% गुण प्राप्त असल्यास त्यांचे २०% प्रमाणे गुण काढण्यात येतील) {Proportion= ६० X २०/१०० = १२ गुण}	जास्तीत जास्त २० गुण ग्राहय धरले जातील
३	योग प्रात्याक्षिक व मुलाखत		जास्तीत जास्त ३० गुण ग्राहय धरले जातील.
		एकुण गुण	**१०० गुण**

२१) सदरील गुणांकनानुसार, गुणवत्तेप्रमाणे निवड करताना उमेदवारांची तालुकानिहाय पॅनल यादी तयार करण्यात येऊन, उमदेवारांना समान गुण असल्यास, ज्या उमेदवारांचे वय जास्त असेल त्यास प्रथमतेने निवडण्यात येईल. जर वयामध्ये एकसमानता येत असल्यास, संबधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल. यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

२२) अर्जासोबत नमुद करण्यात येत असलेला मोबाईल क्रमांक हा संपूर्ण पदभरती प्रक्रिया होईपर्यन्त चालु स्थितीत राहण्याची दक्षता उमेदवारांनी घेण्यात यावी.

(स्वाक्षरीत /-)
जिल्हा आयुष अधिकारी
तथा सदस्य, योग प्रशिक्षक पदभरती निवड समिती,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

(स्वाक्षरीत /-)
योग प्रशिक्षण संस्था प्रमुख
तथा सदस्य, योग प्रशिक्षक पदभरती निवड समिती,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

(स्वाक्षरीत /-)
जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा अध्यक्ष, योग प्रशिक्षक पदभरती निवड समिती,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

रा.आ.अ., जि.प.आ.क्र.सो., आरोग्य विभाग, जि.प. सोलापूर.

कार्यालयीन अर्जाचा नमुना, सन २०२३-२४ (४ थी जाहिरात)

राष्ट्रीय आरोग्य अभियान,

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

अलीकडील रंगीत छायाचित्र लावावे

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक :-

प्रति,

मा. जिल्हा आरोग्य अधिकारी तथा अध्यक्ष,
योग प्रशिक्षक पदभरती निवड समिती,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर.

पदाचे नाव :- योग प्रशिक्षक या पॅनलवरील पदाकरीता अर्ज.

१) उमेदवारांचे संपूर्ण नाव (देवनागरी) :- --

Candidate Name (English Capital) :- ____

२) उमेदवारांचे बदल असलेले नाव :- --

३) उमेदवारांच्या वडील/पती संपूर्ण नाव :- --

४) उमेदवारांची जन्म तारीख :- दिवस ... ... महिना ... ... वर्ष ... ...

अक्षरी जन्म तारीख :- --

वय :- ... ... वर्षे पुर्ण, ... महिने पुर्ण, ... दिवस.
(जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिवशी)

५) उमेदवाराचा पत्ता :- --

मोबाईल क्रमांक :- ... ...

Email Id :- ________________________________

(नमुद करणे अनिवार्य)

६) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र :- आहे / नाही (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

७) अर्जदाराची वैवाहिक परिस्थिती :- विवाहीत / अविवाहीत (चुकीच्या पर्यायावर रेघ मारणे)

अर्जदाराकरीता टिप :- अर्ज कार्यालयास जमा केल्याची पोहोच पाहिजे असल्यास, सदरील पानावरील संपूर्ण माहिती भरुन झेरॉक्स काढून घेऊन येणे.

रा.आ.अ., जि.ए.आ.कु.क.सो., आरोग्य विभाग, जि.

८) पदविका (Diploma) :-

धारण केलेली पदविका	बोर्डचे नाव	उत्तीर्ण वर्ष	मिळालेले गुण	टक्केवारी

९) पदवी (Degree) :-

धारण केलेली पदवी	विदयापीठाचे नाव	उत्तीर्ण वर्ष	मिळालेले गुण	टक्केवारी

१०) पदव्युत्तर पदवी / पदविका (Post Graduation) :-

धारण केलेली पदव्युत्तर पदवी / पदविका	विदयापीठाचे नाव	उत्तीर्ण वर्ष	मिळालेले गुण	टक्केवारी

११) M.Phill –Yog / Ph.D – Yog :-

धारण केलेली पदवी / पदविका	विदयापीठाचे नाव	उत्तीर्ण वर्ष	मिळालेले गुण	टक्केवारी

१२) योग विषयक शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र :-

अभ्यासक्रम /कोर्स चे नाव	बोर्ड / विदयापीठ/संस्थेचे नाव	कोर्स कालावधी		मिळालेले गुण	टक्केवारी
		वर्ष	महिने		

१३) अनुभव :-

अ. क्र.	कार्यालय / विभाग / संस्थेचे नाव	धारण केलेले पद	कालावधी		
			वर्ष	महिने	दिवस

१४) अर्जासोबत खालील प्रती सांक्षकित प्रती जोडलेल्या आहेत.

१) ------------------------------------ २) ------------------------------------

३) ------------------------------------ ४) ------------------------------------

५) ------------------------------------ ६) ------------------------------------

७) ------------------------------------ ८) ------------------------------------

९) ------------------------------------ १०) ------------------------------------

१५) वरील नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बिनचुक आहे. सदर पदाकीरता विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे, याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे, तसेच मी, कोणत्याही शासकिय/निमशासकिय संस्थेकडे आणि NHM अंतर्गत कार्यरत कर्मचारी नाही, त्याचसोबत मी असेही प्रमाणित करतो/करते की वर दिलेली माहिति असत्य, अथवा चुकीची किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास त्यामुळे अपात्र झाल्यास किंवा नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणा-या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहिल. त्याबाबतची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीतील नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन मला मान्य आहेत.

ठिकाण :- सोलापुर. **अर्जदार स्वाक्षरी :- ... ...**

दिनांक :- / /२०२४ **अर्जदाराचे नाव :-** ------------------------------------

==

लहान कुटूबांचे प्रमाणपत्र - नमुना अ

(NHM कडील दि.२३/०७/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये)

मी श्री/श्रीमती/कुमारी --

श्री. -- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय ... ... वर्षे, राहणार -- याव्दारे

पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी **योग प्रशिक्षक** (HWC) या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ... ... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ... ... इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक १) / /२० . २) / /२० .

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकिय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :- सोलापुर. **अर्जदार स्वाक्षरी :- ... ...**

दिनांक :- / /२०२४ **अर्जदाराचे नाव :-** ------------------------------------

(टिप :- वरील लहान कुटूंबांचे प्रमाणपत्र सर्व उमेदवारांनी भरावे. उमेदवार अविवाहीत असल्यास, प्रमाणपत्रातील इतर माहिती भरुन अपत्य संख्या शुन्य (०) अथवा निरंक नमुद करावी.)